# पोखर्णी कृषी विज्ञान केंद्राकडून
# १३ गावातील ४७५ शेतकऱ्यांना बियाणे वाटप




नांदेड,दि.१४- तालुक्यातील पोखर्णी कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने १३ जून रोजी समूह आद्यरेशिय तेलबिया व कडधान्य पीक प्रात्याक्षिकासाठी निवड करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना सोयाबीन (एमएयुएस-६१२) व तूर (बीडीएन -७१६) या वाणाच्या बॅग वितरीत करण्यात आल्या.

पोखर्णी येथील कृषी विज्ञान केंद्रात १३ जून रोजी गुरुवारी खरीप मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी कृषी विज्ञान केंद्राच्या अंतर्गत अमदुरा, पांगरी, बोरगडवाडी, शहापूर, खैरगाव, किकी, भायेगाव, एकरला, वडगाव, जवळगाव, चिखाली, अंबाडी, डुन्द्रा, मुलझरा आदी गावातील ४७५ शेतकऱ्यांना समूह आद्यरेशिय तेलबिया व कडधान्य पीक प्रात्याक्षिकासाठी निवड कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. एस. डी. मोरे व वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. याठिकाणी निवड करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना सोयाबीन (एमएयुएस-६१२) व तूर (बीडीएन -७१६) या वाणाच्या बॅग वितरीत केल्या तसेच कृषी विद्या तज्ञ प्रा. संदीप जायभाये यांनी सोयाबीन व तूर पिकांच्या नवीन वाणाची माहिती दिली. यात पिकांचे अंतर, खत नियोजन, पाणी व्यवस्थापन याविषयी सखोल मार्गदर्शन केले.पीक संरक्षण तज्ञ प्रा.माणिक कल्याणकर यांनी बीजप्रक्रिया, औषधीचा वापर, तसेच जैविक बुरशीनाशक याविषयी माहिती देवून पिकातील रोग आणि किडी व त्यांचे नियंत्रणासंबंधी माहिती दिली. डॉ. एस.डी. मोरे यांनी शेतकऱ्यांना पीक प्रत्याक्षीकाचा योग्य पद्धतीने लागवड करून फायदा घ्यावा आणि आपल्या विविध समस्याचे निवारण करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राची मदत घेउन शेतीची भरभराट करावी असे आवाहन केले. प्रा. अलका पवळे पाटील यांनी सूत्रसंचालन तर डॉ. महेश अंभोरे यांनी आभार मानले.